# **मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २४२ वी बैठक**

| | |
|---|---|
| **दिनांक :** | **०४ जुलै, २०१४ (शुक्रवार)** |
| **वेळ :** | **सायंकाळी ५.०० वाजता** |
| **स्थळ :** | **मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>सहावा मजला, मंत्रालय<br>मुंबई - ४०० ०३२.** |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. ज. स. सहारिया<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री.द म. सुकथनकर | - | सदस्य |
| श्री. मनुकुमार श्रीवास्तव<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री. देबाशिष चक्रबर्ती<br>प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग | - | सदस्य |
| श्री. सिताराम कुंटे<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री. यु.पी.एस. मदान<br>महानगर आयुक्त,<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री. श्रीकांत सिंह
प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग
व
प्रधान सचिव (विशेष प्रकल्प) (अति.कार्यभार),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन

श्री. संजय सेठी
अति.महानगर आयुक्त (१)/प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. वेणूगोपाल रेड्डी
अति.महानगर आयुक्त (२),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. पी. आर. के. मूर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती उमा अडुसुमिली
प्रमुख, नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. डी. संपतकुमार
प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. सु. ल. पिंपळखुटे
वित्त सल्लागार, वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. श. म. सबनीस
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. स. भ. तामसेकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. वि. ग. पाटील
प्रमुख, सामाजिक विकास कक्ष,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. अ. रा. वानखेडे
उप महानगर आयुक्त (भूमी / मिळकत)
भूमी शाखा, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. दि. न. कवठकर
सह प्रकल्प संचालक (जनसंपर्क) आणि
उप महानगर आयुक्त (प्रशासन) (अति.कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. एस. सी. देशपांडे
सह-प्रकल्प संचालक (नगर नियोजन),
माहिती व तंत्रज्ञान कक्ष,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, प्राधिकरणाच्या वतीने मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे महानगर आयुक्त यांनी स्वागत केले.

..३/-

त्यानंतर, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २२ फेब्रुवारी, २०१४ रोजी झालेल्या २४१व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २२ फेब्रुवारी, २०१४ रोजी झालेल्या २४१व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडील मुद्दल व थकीत व्याजाचे निर्लेखन करण्याबाबत.**

३.१ या विषयावर माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वरील रक्कम ब-याच वर्षापासून प्राधिकरणाच्या लेख्यामध्ये थकीत दिसत असल्याने तसेच लेखापरिक्षणात सतत आक्षेप येत असल्याने मा. मुख्य सचिव, व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांच्या आदेशास अनुसरुन सदर प्रकरण संपुष्टात आणून कायस्वरुपी बंद करण्याची आवश्यकता वाटते. तसेच प्राधिकरणाच्या लेख्यांमधून मुद्दल व ठेवीवरील तरतूद केलेल्या व्याजाची रक्कम प्राधिकरणाच्या लेख्यांमधून निर्लेखन करणे आवश्यक आहे. यापूर्वी गृह निर्माण विभागाने प्राधिकरणाच्या ठेवींच्या मुद्दलाची रक्कम व्याज प्रलंबित ठेवून परत केली होती. त्यावेळी कार्यकारी समितीने शासनाकडील या ठेवींबाबत सौम्य धोरण स्विकारुन शासन निर्णयाप्रमाणे परतफेड ग्राहय धरण्यात यावी असे निदेश दिले होते. त्याप्रमाणे व्याज प्रलंबित असतानाही शासनाने केलेल्या परतफेडीप्रमाणे परिगणना करण्यात आली होती. त्या निर्णयास अनुसरुन असे वाटते की, अवर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन यांनी कळविल्याप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने शासन निर्णयाप्रमाणे परत केलेल्या रक्कमेप्रमाणे ११% व ९% व्याजदराने परत फेडीचे पुनर्समायोजन करण्यात यावे तसेच कार्यकारी समितीने नेमून दिलेल्या प्राधिकरणाच्या गुंतवणुकीबाबत धोरणामधील अटी सदरहू प्रकरणाकरीता शिथिल करण्यात याव्यात.

३.२ कार्यकारी समितीचे सदस्य श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी असे नमूद केले की, सदरहू समायोजन करण्याबाबतचा निर्णय हा पाणी पुरवठा विभागाने काढलेला आहे. खरे तर त्यांनी नगर विभागाशी समन्वय साधणे आवश्यक होते. यावर महानगर आयुक्त यांनी

नमूद केले की, सदरहू निर्णय हा शासन स्तरावर तसेच वित्त विभागाच्या औपचारिक मान्यतेने झाल्याने विशेष बाब म्हणून परत केलेली रक्कम व व्याज याचे पुनर्समायोजन करावे तसेच पुढे असेही निदर्शनास आणले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने शासकीय संस्था / सार्वजनिक उपक्रम यांमध्ये केलेली गुंतवणूक व दिलेली कर्जे याचा आढावा घेण्यासाठी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१३ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये मा. मुख्य सचिव यांनी व्याजाची योग्य ती परिगणना करुन त्याप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात यावे असे निर्देश दिले होते.

**निर्णय : या विषयावर चर्चा झाल्यानंतर एका प्रकरणी असा निर्णय घेतल्यास इतर प्रकरणी देखील याचे परिणाम होऊ शकतील, हे गृहित धरुन सदर पुनर्समायोजन मान्य करु नये असे ठरविण्यात आले.**

**बाब क्र.४ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१४ ते दिनांक ३० जून, २०१४**

४.१ सदरहू बाब टिप्पणीतील सविस्तर चर्चा झाल्यानंतर प्राधिकरणाकडे असलेला अतिरिक्त निधी दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१४ ते दिनांक ३० जून, २०१४ गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद घेतली.

४.२ कार्यकारी समितीचे सदस्य श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी गुंतवणूकीचे धोरणाबद्दल माहिती विचारली. यावर महानगर आयुक्त यांनी शासनाच्या वित्त विभागाने दिलेल्या निर्देशानुसार अतिरिक्त निधीचा गुंतवणूक करण्यात येते व साधारणपणे ९.१५% व्याज प्राप्त झाले आहे.

**निर्णय : सदरहू गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र.५ : मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी : सहामाही व्यवस्थापन अहवाल दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१३ ते दिनांक ३१, मार्च, २०१४**

मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधीच्या दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१३ ते दिनांक ३१ मार्च, २०१४ चा सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**निर्णय : सदरहू सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र.६ : वर्सोवा अंधेरी घाटकोपर या मेट्रो रेल्वे मार्गावर सार्वजनिक जलद वाहतुक यंत्रणेच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या स्वतंत्र अभियंत्याच्या सुधारीत खर्चास मंजूरी देण्याबाबत.**

६.१ या विषयावर माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कार्यकारी समितीच्या दिनांक १६ मार्च, २००७ रोजीच्या २१९ व्या बैठकीतील ठराव क्र. १०३० अन्वये वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या मेट्रो रेल्वे मार्गाच्या अंमलबजावणीकरीता स्वतंत्र अभियंता म्हणून लघुत्तम निविदाकार मे. लुईस बर्जर

इन्क्रॉ (यु. एस. ए.)- राईट्स लिमिटेड (जेव्ही) यांची रु. १४,९५,३७,७८९/- अधिक सेवा कर इतक्या फी वर ४२ महिन्याच्या कालावधीकरीता नेमणूक करण्यास मान्यता दिली. तद्नंतर, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि मे. लुईस बर्जर इन्क्रॉ (यु एस ए)-राईट्स लिमिटेड (जेव्ही) यांच्या मध्ये दिनांक २७ एप्रिल, २००७ रोजी करारावर स्वाक्ष-या करण्यात आल्या.

६.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, करारनाम्यानुसार स्वतंत्र अभियंत्याचा कालावधी माहे जानेवारी, २०११ अखेर पूर्ण झाला. करारनाम्यानुसार सल्लागाराचा कालावधी १२ महिन्यापर्यंत वाढविण्याची तरतूद असल्यामुळे त्याच दराने काम करण्यासाठी माहे फेब्रुवारी, २०११ ते जानेवारी, २०१२ पर्यंत मुदत वाढविण्यात आली. त्यानंतर, कार्यकारी समितीने २३४व्या बैठकीमध्ये माहे फेब्रुवारी, २०१२ ते डिसेंबर, २०१३ या कालावधीकरीता मूळ रक्कमेच्या २५% वाढीव दराने म्हणजेच रु.९,७१,८१,६३६/- अधिक सेवाकर या खर्चास मान्यता दिली असून माहे डिसेंबर, २०१३ पर्यत रु.२१,४२,१९,६८८/- एवढा प्रत्यक्ष खर्च झालेला आहे.

६.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, सदर प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम पूर्ण झाले असून सदर प्रकल्प जनतेसाठी दिनांक ८ जून, २०१४ रोजी खुला करण्यात आला आहे. करारनाम्यानुसार प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर ६ महिने कालावधी गृहीत धरुन स्वतंत्र अभियंत्याचा कालावधी माहे डिसेंबर, २०१४ पर्यंत वाढविण्याचे प्रस्तावित आहे. तसेच स्वतंत्र अभियंत्यांचा होणारा खर्च स्पेशल पर्पज व्हेईकल (SPV) मुंबई मेट्रो वन प्रायव्हेट लिमिटेड आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी सवलत करारनाम्यातील कलम २०.३ प्रमाणे ५०:५० या प्रमाणात करावयाचा आहे. ही बाब लक्षात घेता स्वतंत्र अभियंत्याला माहे जानेवारी, २०१४ ते डिसेंबर, २०१४ या कालावधीकरीता उपभोक्ता मूल्य सूचकानुसार वाढीव खर्चाच्या अनुषंगाने रु.४,२८,४३,२८८/- अधिक सेवा कर या वाढीव खर्चापैकी प्राधिकरणावर येणारा खर्च ५०% म्हणजे रु. २,१४,२१,६४४/- इतका असेल असे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

६.४ वरील विषयावर बोलताना कार्यकारी समितीच्या सदस्यांनी अशी विचारणा केली की, सल्लागाराच्या करारनाम्यात मुदतवाढ देण्याची तरतूद आहे का? तसेच स्वतंत्र अभियंत्यास सदर प्रस्तावात Man Month Fee मध्ये वाढ देण्याचे प्रस्तावित आहे का? यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सल्लागाराच्या करारनाम्यात तरतूद असल्यामुळे याअगोदर कार्यकारी समितीने त्यांच्या २३४व्या बैठकीत २५% वाढीव दराने माहे डिसेंबर, २०१३ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. तसेच पुढे असेही सांगितले की, सध्याच्या प्रस्तावात स्वतंत्र अभियंत्याच्या Man Month Fee मध्ये कोणतीही दरवाढ करण्यात आलेली नाही.

वरील दोन्ही मुद्दयांची खात्री करुन घ्यावी अशी महानगर आयुक्तांना कार्यकारी समितीने सूचना केली.

**निर्णय : तद्नंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १२५७:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प वर्सोवा-अंधेरी-घाटकोपरच्या कामाकरीता नेमणूक केलेल्या स्वतंत्र अभियंत्यास दिनांक ०१ जानेवारी, २०१४ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ पर्यंतचा कालावधीकरीता रु.४,२८,४३,२८८/- अधिक सेवा कर या वाढीव खर्चास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ : संत गाडगे महाराज चौक - वडाळा - चेंबूर या मार्गावर सार्वजनिक वाहतूक यंत्रणेच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्रकल्प व्यवस्थापन व प्रुफ चेकिंग सल्लागार मे. लुईस बर्जर ग्रुप यांना वाढीव मुदत आणि त्यासाठी सुधारीत खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

७.१ या विषयावर माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, दिनांक २८ मे, २००९ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या २२७व्या बैठकीत ठराव क्र. ११३१ अन्वये ३० महिन्यासाठी रु.३५,११,५०,०००/- अधिक सेवा कर एवढ्या रक्कमेकरिता मे. लुईस बर्जर ग्रुप यांना प्रकल्प व्यवस्थापन आणि प्रुफ चेकिंग सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देण्यात आली होती. सदर प्रकल्पाच्या करारनाम्यानुसार बांधकामाचा कालावधी ३० महिने इतका असून प्रकल्प माहे मे, २०११ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतु काम पूर्ण करण्यास येणाऱ्या अडचणी लक्षात घेता प्रकल्प व्यवस्थापन व प्रुफ चेकिंग सल्लागार यांचा कार्यकाळ कार्यकारी समितीच्या २३६व्या बैठकीत ठराव क्र. १२१७ अन्वये माहे, २०१२ ते माहे फेब्रुवारी, २०१४ पर्यंत (२४ महिने) रु. ३३,००,००,९०९/- अधिक सेवा कर अशा वाढीव मुदत व खर्चास मान्यता देण्यात आली होती.

७.२ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मोनोरेल टप्पा-१ वडाळा ते चेंबूर या मार्गिकेचे काम पूर्ण झाले असून सदर मार्ग दिनांक ०२ फेब्रुवारी, २०१४ रोजी प्रवासी वाहतूकीसाठी खुला करण्यात आलेला आहे. टप्पा-२ चे स्थापत्य काम अंदाजे ८५% पूर्ण झाले आहे. पुढे त्यांनी असेही सांगितले की, मुंबई मोनोरेल प्रकल्पाचे बांधकाम सुरु करण्यापुर्वी अरुंद रस्त्यावरील वाहतूक वळविणे अथवा फेरबदल करणे गरजेचे असल्याने, वाहतूक पोलिसांची परवानगी मिळण्याच्या प्रक्रियेस बराच कालावधी लागला. तसेच मोनोरेल मार्गिकेमध्ये बाधित होणाऱ्या झोपडयांचे पुनर्वसन, झाडांचे पुनःरोपण / कापणे, भूमिगत जल वाहिन्या इ. स्थलांतरित करणे यासाठी स्थानिक संस्थेकडून परवानगी मिळण्यास आणि सदर कार्यवाही करण्याच्या प्रक्रियेस बराच कालावधी लागला. याशिवाय टप्पा-२ मध्ये हार्बर रेल्वेवरील वडाळा रोड व मध्य रेल्वेवरील करी रोड येथील रेल्वेचे रुळ ओलांडावे लागतात. रेल्वेचा रुळ ओलांडण्याकरिता परवानगी मिळण्यासाठी बराच कालावधी लागत आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता रेल्वेची परवानगी मिळाल्यानंतर प्रकल्प पूर्ण करण्यास अजून दीड वर्षाचा कालावधी लागणे अपेक्षित असल्याने प्रकल्प व्यवस्थापन व प्रुफ चेकिंग सल्लागार यांचा कार्यकाळ माहे डिसेंबर, २०१५ पर्यंत वाढविण्याकरिता प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

७.३ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मे. लुईस बर्जर ग्रुप यांनी प्रत्यक्ष मनुष्यबळाप्रमाणे (Actual Man Month Basis) प्रकल्प व्यवस्थापन व प्रुफ चेकिंग सल्लागार म्हणून २२ महिन्यांसाठी रु. ३७,२४,६०,७१२/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केला होता. सल्लागाराने सादर केलेला अतिरिक्त रक्कमेचा प्रस्ताव जास्त वाटत असल्याने त्यांनी प्रस्तावित केलेले मनुष्यबळ यावर समितीमार्फत तपासणी करण्यात आली.

७.४ तद्‌नंतर मे. लुईस बर्जर ग्रुप यांनी दिनांक २० मे, २०१४ रोजी २२ महिन्यांसाठी रु. २०,९८,२२,५००/- इतक्या रक्कमेसाठी सुधारीत प्रस्ताव सादर केला. सदर प्रस्तावास मे. लुईस बर्जर ग्रुप यांनी दाखविलेले मनुष्यबळ वाजवी असल्याने, समितीने अशी शिफारस केली आहे की, प्रकल्पाच्या वाढीव कालावधीकरिता प्रकल्प सल्लागाराला ७०% फी प्रत्यक्ष मनुष्यबळानुसार (Actual Man Month basis) आणि ३०% फी, ही प्रकल्पाच्या वित्तीय प्रगतीनुसार देण्यात यावी. सदर फीमध्ये प्रकल्पाच्या प्रुफ चेकिंग व पाहणीकरिता (Inspection) लागणारा खर्च समाविष्ट आहे.

७.५ सदर विषयावर चर्चा करताना कार्यकारी समितीच्या सदस्यांनी अशी विचारणा केली की, मनुष्यबळ (Man Month fee) फी वाढविण्यात आली आहे का? तसेच सदर सल्लागाराच्या करारनाम्यात वाढीव कार्यकाळासाठी तरतूद आहे का किंवा कसे?

यावर माहिती उत्तरे देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मनुष्यबळ फी (Man Month Fee) मध्ये कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही. तसेच सल्लागारासोबत केलेल्या करारनाम्यात आणि पुरवणी करारनाम्यात प्रकल्पाचा कालावधी ३० महिने + तफावत कालावधी ३ महिन्यापेक्षा जास्त असल्यामुळे त्या कालावधीकरिता लागणारी अधिक फी सल्लागारांना लागणारे मनुष्यबळ यावर अवलंबून राहील आणि त्या अतिरिक्त फी करिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे, असा उल्लेख असल्याचे सांगितले.

७.६ तद्नंतर, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, सदर प्रकल्प पूर्ण करण्यास डिसेबर, २०१५ पेक्षा अधिक कालावधी लागण्याची शक्यता आहे किंवा कसे? यावर अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी असे सांगितले की, करीरोड आणि वडाळा रोड येथे रेल्वे रुळ ओलांडण्यासाठी लागणारा वेळ, रेल्वेचा रुळ ओलांडण्यासाठी मध्य रेल्वेकडून परवानगी मिळण्याचे काम प्रगतीपथावर आहे, गर्डर लाँचिगचे काम रेल्वे अधिकारी यांच्या उपस्थितीत करावे लागत आहे. परंतु हा प्रकल्प नोव्हेंबर, २०१५ पर्यंत पूर्ण करण्यासाठी सविस्तर प्रकल्प मुल्यमापन पुनर्विलोकन प्रकिया (Detailed PERT) तयार केली असून अतिरिक्त महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सातत्याने आढावा बैठका घेण्यात येत आहेत.

**निर्णय : तद्नंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १२५८ :**

“**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिनियम, १९७४च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे मुंबई मोनोरेल प्रकल्प- संत गाडगे महाराज चौक - वडाळा - चेंबूर या कामाकरीता नेमणूक केलेल्या प्रकल्प व्यवस्थापन व प्रुफ चेकींग सलागार मे. लुईस बर्जर ग्रुप, आ.एन.सी. (USA) यांना माहे मार्च, २०१४ ते डिसेंबर, २०१५ (२२ महिने) पर्यंतच्या वाढीव कालावधीकरीता रु.२०,९८,२२,५००/- अधिक सेवा कर या वाढीव खर्चास मान्यता देत आहे.

“**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**बाब क्र.८ : भिवंडी वाडा रस्ता (रा.म.क्र.४५) येथील वंजारपट्टी, भिंवडी येथील बांधकाम सुरु असलेल्या उड्डाणपुलास दोन अतिरिक्त मार्गिकांसह जोडणी करणे, कामाचे संकल्पन व बांधकाम करणे या कामी मागविण्यात आलेल्या निविदेस मंजूरी देणे.**

८.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे हाती घेण्यात आलेल्या विस्तारीत मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत भिवंडी -वाडा रस्ता (रा.म.क्र.४५) येथील वंजारपट्टी, भिवंडी येथील साखळी क्र.०/२०० ते ०/९५० दरम्यान दोन पदरी उडडाणपूलाचे बांधकाम करण्याच्या कामाचा समावेश आहे. सदर काम प्रगतीपथावर असून या उड्डाणपुलात अतिरीक्त मार्गिका देण्याच्या कामांचा समावेश करणेबाबतचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या दिनांक २८ नोव्हेंबर, २०१३ रोजी पार पडलेल्या २४०व्या बैठकीत सादर करण्यात आला होता. या विषयावरील चर्चेत असे ठरविण्यात आले की, सदर अतिरीक्त कामांचा समावेश सुरू असलेल्या कामाच्या निविदेत न करता सदर कामे स्वतंत्र निविदा मागवून करण्यात यावीत. त्याचप्रमाणे सध्या उड्डाणपुलाचे काम करीत असलेल्या ठेकेदारास अतिरीक्त मार्गिकांच्या कामांचे या नविन निविदा प्रक्रियेत ‘‘काम नाकारण्याचा प्रथम अधिकार’’ देण्यात यावा.

८.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, कार्यकारी समितीने दिलेल्या निर्देशानुसार शिवाजी चौक दिशेकडे व नाशिक महामार्ग दिशेकडे उड्डाणपुलास अतिरीक्त मार्गिका देणे या कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ठाणे जिल्हयाच्या सन २०१२-१३ च्या दरसूचीवर आधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यानुसार या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू. २७.४२ कोटी असून या किंमतीवर आधारीत निविदा मागविण्यात आल्या. या कामांची लांबी अनुक्रमे ३१८ मीटर व ३८१ मीटर तर रूंदी अनुक्रमे ६.५ मीटर व ८.५ मीटर इतकी असून यातील शिवाजी चौक दिशेकडील मार्गिका एक पदरी तर नाशिक महामार्गाकडील मार्गिका दोन पदरी वाहतूकीसाठी बांधण्याचे नियोजन आहे.

८.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, या कामाची ई-निविदा प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात दिनांक १४ फेब्रुवारी, २०१४ रोजी प्रदर्शित करण्यात आली. निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यत तीन निविदाकारांनी निविदा सादर केल्या असून तीनही निविदा तांत्रिक पडताळणी दरम्यान पात्र ठरल्याने आर्थिक देकारांचे ‘क’ लिफाफे दिनांक ०७ मे, २०१४ रोजी उघडण्यात आले. प्राप्त आर्थिक देकारांची माहिती पुढीलप्रमाणे आहे :

| | |
|---|---|
| १. मे. अरविंद टेक्नो (प्रा.)लि. | - रू. ३४,९६,००,००० /- |
| २. मे.जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस_लि. | - रू. ३५,६४,६०,००० /- |
| ३. मे. जे.एम.सी. प्रोजेक्ट (इं) लि. | - रू. ३३,९३,००,००० /- |

प्राप्त निविदांमधील मे.जे.एम.सी.प्रोजेक्ट (इं) लि. यांनी सादर केलेली रू. ३३.९३ कोटी रक्कमेची निविदा लघुत्तम असून ती निविदा रक्कमेपेक्षा २३.७४% जास्त आहे.

८.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, मे. जे.एम.सी. प्रोजेक्ट (इं) लि. यांना त्यांनी सादर केलेल्या आर्थिक देकाराची रक्कम कमी करणेबाबत व जास्त रक्कमेचा देकार सादर करणेबाबत खुलासा करण्यास सांगण्यात आले. त्यानुसार निविदाकाराने सादर केलेल्या खुलाशावर सल्लागारानी पुढीलप्रमाणे अभिप्राय दिला,

८.४.१ या भागासाठी वैशिष्टपूर्ण प्रकारचे शटरिंग वापरावे लागणार असून हे शटरिंग फक्त एकदाच वापरण्याजोगे राहणार आहे, तसेच cast-in-situ प्रकारच्या कामासाठी वैशिष्टपूर्ण formwork वापरावे लागणार आहे.

८.४.२ कामाच्या स्वरूपानुसार यासाठी ठरविण्यात आलेला १२ महिन्याचा कालावधी कमी असल्याने यासाठी मनुष्यबळ, यंत्रसामग्री याकरिता जास्त गुंतवणूक करावी लागणार आहे.

८.४.३ सदर कामाचे अदांजपत्रक आधारित दरसूची व सध्याची दरसूची यातील दरांमध्ये १०% वाढ आहे.

८.४.४ सदर काम अतिवाहतूकीच्या वर्दळीच्या भागात असून मर्यादित कामाच्या वेळा आणि सेवावाहिन्यांचे जाळे यामुळे खर्चात वाढ होणार नाही.

८.५ वरील बाबी लक्षात घेऊन पुढील प्रमाणे वस्तुस्थिती महानगर आयुक्त यांनी सादर केली :-

८.५.१ निविदा प्रक्रिया इ-टेंडर पध्दतीने करण्यात आली होती.

८.५.२ निविदा प्रक्रियेत ३ निविदाकारांनी भाग घेतला होता व तीनही आर्थिक देकारांमधील फरक अल्प असल्याने निविदाकारांमध्ये स्पर्धा झाल्याचे दिसून येते.

८.५.३ फेर निविदा मागविल्यास पुढे प्राप्त होणा-या निविदांचे देकार सध्याच्या देकारांपेक्षा कमी असण्याची खात्री देता येत नाही.

निविदाकाराने सादर केलेला रु. ३३.९३ कोटीचा देकार निविदा रक्कम रु.२७.४२ कोटी या पेक्षा २३.७४ %अधिक असून दरसूचीतील फरकाचे १०% वगळता सध्याच्या दरसूचीपेक्षा १३.७४ % अधिक आहे.

८.६ वरील बाबींचे अवलोकन करुन महानगर आयुक्त यांनी “भिवंडी वाडा रस्ता (रा.म.क्र.४५) येथील वंजारपट्टी, भिवंडी येथील बांधकाम सुरू असलेल्या उड्डाणपुलास दोन अतिरिक्त मार्गिकांसह

जोडणी करणे, कामाचे संकल्पन व बांधकाम करणे" या कामी प्राप्त झालेली मे. जे.एम.सी. प्रोजेक्ट (इं) लि. यांनी सादर केलेली रु. ३३.९३ कोटी रक्कमेची निविदा कार्यकारी समितीच्या मंजूरीसाठी सादर केली असल्याचे सांगितले.

८.७ कार्यकारी समितीचे सदस्य श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी सदर प्रकरणी प्रकल्पाच्या मुळ अंदाजपत्रकीय रक्कमेत वाढ झाली असल्याने सदर बाब प्राधिकरणाच्या बैठकीत सादर करण्यात यावी असे सुचविले. यावर, महानगर आयुक्त यांनी मुळ प्रकल्पास प्राधिकरणाची मंजूरी असून सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेची बाब प्राधिकरणाच्या निदर्शनास माहितीसाठी आणण्यात येईल असे सांगितले.

**निर्णय : त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केलाः -**

**ठराव क्र. १२५९ः**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत व त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे "भिवंडी-वाडा रस्ता (रा.म.क्र.४५) येथील वंजारपट्टी, भिवंडी येथील बांधकाम सुरु असलेल्या उड्डाणपुलास दोन अतिरिक्त मार्गिकांसह जोडणी करणे, कामाचे संकल्पन व बांधकाम करणे" चे कामे प्राप्त झालेली मे. जे.एम.सी. प्रोजेक्ट (इं) लि. यांनी सादर केलेली रु.३३.९३ कोटी रक्कमेची निवीदा स्विकारण्यास, अधिक प्रत्यक्ष कामानुसार अनुज्ञेय भाववाढ (Escalation) अदा करण्यास व त्याअनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.९ : मुंबई महानगर प्रदेशांतर्गत ओशिवरा जिल्हा केंद्रामधील पायाभूत सुविधा पुरविण्याकरीता घेण्यात येणा-या कामांना प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.**

९.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, जोगेश्वरी व गोरेगांव स्थानकांमधील ओशिवरा या ठिकाणाची जिल्हा केंद्र म्हणून निवड करण्यात आली आहे व त्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे 'विशेष नियोजन प्राधिकरण' आहे. सध्या ओशिवरा जिल्हा केंद्रात

अनेक निवासी व व्यावसायिक वसाहती मोठया प्रमाणावर निर्माण होत आहेत. तसेच प्राधिकरणातर्फे प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन या ठिकाणी करण्यात आले आहे. या परिसरातील मुलभूत पायाभूत सुविधांसाठी मोठया प्रमाणात खर्च करण्यात आलेला नाही. तरी नगर व क्षेत्र नियोजन विभागाने तयार केलेल्या आराखडयांप्रमाणे या विभागातील रस्ते विकसित करणे प्रस्तावित आहे. तसेच जिल्हा केंद्रांमध्ये मुंबई महानगरपालिकेच्या शे-यानुसार जलवाहिन्या व मलनिसा:रण वाहिन्या पुरविणे प्रस्तावित आहे.

९.२ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी नकाशाव्दारे असे स्पष्ट केले की, काही रस्त्यांची कामे ताबडतोब हाती घेणे शक्य आहे व काही ठिकाणी अतिक्रमणे आहेत. सदर अतिक्रमणे निष्कासित करुन त्यानंतर तेथील कामे हाती घेणे प्रस्तावित आहे. त्यानुसार रस्त्यांची उपयोगिता व जागेची उपलब्धता यानुसार कामांची खालीलप्रमाणे तीन प्राथम्यामध्ये विभागणी करण्यात आली आहे :-

**प्राधान्य -१**

| **अ.क्र.** | **रस्त्याचे नाव** | **लांबी** | **अंदाजित खर्च (रू. कोटी)** |
|---|---|---|---|
| १. | रस्ता ई ते एफ | ३६० | ११.६४ |
| २. | रस्ता के - जे - आय | ६७० | १५.७५ |
| ३. | रस्ता सी - डी | १२० | २.४५ |
| ४. | राम मंदीर रस्त्याचे काँक्रिटीकरण | ६०० | ३.६५ |
| ५. | रोड एफ - के (पुर्नपृष्ठीकरण) | ३०० | २.७८ |
| ६. | रस्ता एल - डी | ३२० | १.७१ |
| ७. | रस्ता पी - एल (पुर्नपृष्ठीकरण) | ५२० | १.१८ |
| ८. | रोड एक्स - एक्स - १ (जलवाहिनी पुरविण्याकरिता ) | २३० | ०.१६ |
| ९. | रोड ए - बी (जलवाहिनी पुरविण्याकरिता ) | ४०० | ०.५६ |
| | **एकूण रक्कम** | | **३९.८८** |

**प्राधान्य -२**

| **अ.क्र.** | **रस्त्याचे नाव** | **लांबी** | **अंदाजित खर्च (रू. कोटी)** |
|---|---|---|---|
| १. | रोड जी - एच - आय | २९० | ७.८७ |
| २. | रस्ता एच - एन | २०० | ३.७९ |
| ३. | रस्ता एफ - एफ -१ | २३० | ३.२३ |
| | **एकूण रक्कम** | | **१४.८९** |

**प्राधान्य -३**

| अ.क्र. | रस्त्याचे नाव | लांबी | अंदाजित खर्च (रू. कोटी) |
|---|---|---|---|
| १. | रस्ता एल - जे | १५० | २.७० |
| २. | रस्ता एन - ओ | २६० | ५.११ |
| | **एकूण रक्कम** | | **७.८१** |
| | | | |
| | **प्राधान्य १ +२+३ ची एकूण रक्कम** | | **६२.५८** |

९.३ महानगर आयुक्त यांनी समितीच्या असे निदर्शनास आणून दिले की, प्राधिकरणाने २०१४-१५ सालच्या अर्थसंकल्पामध्ये २० कोटी इतक्या रक्कमेची अर्थसंकल्पिय तरतूद केली आहे.

सदर जिल्हा उपकेंद्रातील कामे हाती घेण्यासाठी महानगर आयुक्त यांनी कार्यकारी समितीस ६२.५८ कोटी रुपयांच्या एकत्रित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती केली.

९.४ यावर मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार कार्यकारी समितीस आहेत किंवा कसे याची विचारणा केली. त्यावर महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, ओशिवरा जिल्हा केंद्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची नियुक्ती केली असल्यामुळे या जिल्हा केंद्रास मुलभूत सुविधा पुरविणे हे प्राधिकरणाचे कर्तव्य आहे व यासाठी प्राधिकरणाच्या बैठकीसमोर स्वतंत्र प्रस्ताव ठेवणे अपेक्षित नाही.

मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सदर जिल्हा केंद्रातील कामे ही टप्प्याटप्प्यात व प्राथम्य क्रमाने जागेच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्यात यावीत.

तसेच प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये सदर कामांचा अहवाल सादर करण्यास सांगितले.

**निर्णय : त्यानंतर, कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला : -**

**ठराव क्र. १२६०:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ७ चे उप-कलम (३) चे पोटकलम (२) व (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे, ओशिवरा जिल्हा केंद्रातील वरील प्रस्तावित रस्ते व इतर पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी लागणा-या रु. ६२.५८ कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही टप्प्या-टप्प्याने करण्यांस महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१० : विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत कटाई नाका ते बदलापूर राज्य मार्ग ४३ या सुधारीत कामाच्या वावास मंजूरी मिळणेबाबत.**

१०.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत कटाई नाका ते बदलापूर राज्य मार्ग ४३ च्या सुधारीत कामाच्या वावास मंजूरी मिळणेबाबतचा प्रस्ताव मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २२ फेब्रुवारी, २०१४ रोजी झालेल्या २४१व्या बैठकीत सादर करण्यात आला होता. या बैठकीमध्ये सदर कामाच्या व्याप्तीमध्ये होणारी वाढ व त्याअनुषंगाने किंमतीतील होणा-या वाढीबद्दल कारणमीमांसा सल्लागाराच्या अभिप्रायासह सादर करण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या.

१०.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, या प्रकल्पाच्या कामाचे सर्वेक्षण करणे, भुसंपादन करणे व अंदाजपत्रक तयार करणे या कामांसाठी मेसर्स मोनार्च सर्व्हेअर यांची नेमणूक करण्यात आली होती व कामाचे दैनंदिन देखरेख करण्यासाठी मेसर्स एस.पी.ए. या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे. कटाई नाका ते बदलापूर हा राज्य मार्ग ४३ असून सदर रस्ता कल्याण शिळ जंक्शन वर कटाई नाका येथून सुरु होऊन बदलापूर येथील राज्य मार्ग ३५ ला जोडला जातो. या रस्त्याची एकूण लांबी १९.२० कि.मी. आहे. उपरोक्त रस्त्याची कटाईनाका ते फायबर ग्लास फॅक्टरी पर्यंतची लांबी १२.९० कि.मी. असून या भागामध्ये अस्तित्वातील रस्त्याची डांबरी पृष्ठभागाची रुंदी १४ मी. उपलब्ध होती. तसेच उर्वरित भागातील ६.३ कि.मी. लांबीतील रस्त्याची रुंदी ५.५० मी. होती. एम.आय.डी.सी. ने सदर रस्ता बांधकाम करताना कोणत्याही प्रकारच्या ग्रेड सुधारणा केलेल्या नव्हत्या तसेच सदर लांबीमधील अंबरनाथ नगरपरिषद क्षेत्राच्या लांबीतील रस्ता व कुळगांव - बदलापूर नगरपरिषद हददीतील रस्ता देखभाल दुरुस्ती अभावी अत्यंत खराब होता. त्यामुळे वाहतूकीस सदर अंतर कापण्यास सुमारे ४५ मिनीटांचा कालावधी लागत असे. या सर्व ठिकाणी ग्रेड सुधारणेसह प्रस्तावित करण्यात आलेल्या कामांमुळे हे अंतर कापण्यास सध्या २५ मिनिटाचा कालावधी लागतो. अंबरनाथ - बदलापुर शहराचे होणारे वाढते नागरीकरण, प्रस्तावित ऐरोली - कटाई नाका तसेच कल्याण - अंबरनाथ तालुक्यातील प्राधिकरणामार्फत होणारा २७ गावांचा विकास यामुळे या रस्त्यावरील वाहतुकीत मोठया प्रमाणावर वाढ अपेक्षित आहे.

१०.३ उपरोक्त कामाच्या व्याप्तीतील वाढ, भाववाढीपोटी कंत्राटदारांना देय होणारी रक्कम, रस्त्याच्या सुधारणेच्या कामात अडथळा ठरणाऱ्या सेवा वाहीन्या स्थलांतरीत करण्यासाठी प्रत्यक्ष येणारा खर्च व कामावरील नियुक्त केलेला प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्या देय फी चा होणारा खर्च विचारात घेऊन महानगर आयुक्त यांनी रु. १३९.९५ कोटी (५४.१२ टक्के जास्त) रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास्तव विनंतीचा प्रस्ताव सादर केला. कामाच्या निविदेतील व्याप्तीमध्ये होणारी वाढ व त्या अनुषंगाने निविदा किंमतीतील वाढ तक्ता खालील प्रमाणे आहे :-

| **अ.क्र** | **खर्चाचा तपशील** | | **रक्कम** |
|---|---|---|---|
| **अ.** | **सुधारीत कामाचा वाव व अतिरीक्त बाबी.** | | |
| १. | सेवा वाहिन्या स्थलांतरीत करणे. | ३.९५ कोटी | |
| २. | वेज शिअर इलेमेंट लेअर | २.५३ कोटी | |
| ३. | डांबरी पृष्ठभागाच्या रस्त्याऐवजी सिमेंट काँक्रीटचा रस्ता. | ४.८३ कोटी | |
| ४. | दगडी अस्तराचे गटार व इतर अतिरीक्त कामे. | २.४७ कोटी | |
| | **एकुण** | **१३.७८ कोटी** | **१३.७८ कोटी (अ)** |
| **ब.** | **सेवा वाहिन्या संरक्षण व पावसाळयापुर्वी रस्ता दुरुस्ती** | | |
| १. | सेवा वाहिन्या सुरक्षा | ३.५८ कोटी | |
| २. | पावसाळयापुर्वी रस्ता दुरुस्ती | ३.६० कोटी | |
| | **एकुण** | **७.१८ कोटी** | **७.१८ कोटी (ब)** |
| **क.** | **अंदाजपत्रकातील बाबींच्या परीमाणातील वाढ** | | |
| १. | ऐल सेक्शन सुधारणामुळे जी.एस.बी. वेट मिक्स परीमाणातील वाढ | ५.५३ कोटी | |
| २. | सिमेंट काँक्रीट पर्जन्य वाहिन्या लांबी मधील वाढ | २.७० कोटी | |
| ३. | पाणी वाहून नेण्याच्या प्रणाली (सी.डी वर्क) वाढ. | २.४९ कोटी | |
| | **एकुण** | **१०.७२ कोटी** | **१०.७२ कोटी (क)** |
| **ड.** | **प्रस्तावित पुरवणी कामांमुळे होणारी संभाव्य वाढ.** | | |
| १. | रस्ता दुभाजकातील विद्युत खांब. | ४.३६ कोटी | |
| २. | रस्ता दुभाजाकामध्ये मोठे कर्ब स्टोनचे काम. | ४.०० कोटी | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | जंक्शन सुधारणा. | ५.११ कोटी | |
| ४. | एम.आय.डी.सी. पाईप लाईन करीता संरक्षण व्यवस्था. | ३.१० कोटी | |
| | **एकुण** | **१६.५७ कोटी** | **१६.५७ कोटी (ड)** |
| | **एकुण अ + ब + क + ड** | | **४८.२५ कोटी** |
| | निविदा रक्कम (७.७७ टक्के कमी दराने) | | ७६.४९ कोटी |
| | एकूण खर्च | | १२४.७४ कोटी |
| | भाव वाढ @ १०% | | १२.४७कोटी |
| | पी एम सी चे शुल्क @ २.२० % | | २.७४कोटी |
| | सुधारीत प्रशासकीय मान्यता रक्कम | | १३९.९५कोटी |
| | मुळ प्रशासकीय मान्यता रक्कम | | ९०.८० कोटी |
| | मुळ प्रशासकीय मान्यता किंमतीत होणारी वाढ | | ४९.१५ कोटी (५४.१२ %) |

१०.४ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, वरील तक्त्यातील क्र. 'ड' मध्ये नमुद केलेली रु.१६.५७ कोटी रक्कमेची प्रस्तावित पुरवणी कामे व भाववाढ वगळता मुख्य रस्त्यावरील कामे पूर्ण करण्याकरीता रु. १०८.१७ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. उपरोक्त पुरवणी कामे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१४-२०१५ चे दरसुचीवर आधारीत सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेसाठी नविन निविदा मागविल्यास दरसुचीतील नविन व जुन्या दरांच्या फरकामुळे कामाच्या किंमतीत सुमारे २४ % इतकी वाढ अपेक्षित आहे. त्यामुळे रु. १६.५७ कोटी रक्कमेची पुरवणी कामे याच कंत्राटातून करण्याचे प्रस्तावित करण्यात येत असल्याचे महानगर आयुक्त यांनी नमुद केले.

१०.५ अतिरीक्त महानगर आयुक्त - १ यांनी असे सांगितले की, प्रस्तावित अंदाजपत्रकीय किंमतीत झालेल्या वाढीबाबत संबंधित प्रकल्प सल्लागाराकडून खुलासा मागविण्यात आला असून अंदाजपत्रकीय किंमतीमधील वाढीची कारणे पुढील प्रमाणे आहेत. अस्तित्वातील सेवा वाहिन्या स्थलांतर करणे, कुळगांव - बदलापुर नगरपरिषद हद्दीतील डांबरी पृष्ठभागाच्या रस्त्याऐवजी सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता करणे, बरेच वर्षे एम.आय.डी.सी. व नगरपरिषद यांनी रस्त्याची देखभाल व दुरुस्ती न केल्यामुळे रस्ता वाहतुक योग्य करण्यास्तव करावी लागलेल्या कामांचा समावेश आहे. तसेच अस्तित्वातील सेवा वाहिन्या सुरक्षित करण्यासाठी रस्त्याच्या एल सेक्शन मध्ये करावे लागलेले बदल यामुळे अनुषंगिक बाबीत वाढ झालेली आहे. तसेच भाववाढ खंडापोटी देय होणारी रक्कम, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या फी तील वाढ ही प्रमुख कारणे आहेत.

१०.६ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अ.क्र. 'ड' मधील पुरवणी कामे याच कंत्राटातून न करता स्वतंत्ररीत्या प्राधिकरणाची मान्यता घेऊन नविन निविदा काढून काम करण्याचे सुचविले व या प्रमाणे कार्यकारी समितीने त्यास मंजूरी दिली.

तसेच कार्यकारी समितीचे निमंत्रित सदस्य श्री. श्रीकांत सिंह, प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग यांनी उपरोक्त बदलासह सदरील मंजूरी प्रदान करण्यात येत असल्याचे नमुद केले. तसेच ही बाब प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत कार्योत्तर माहितीसाठी सादर करण्यात यावी असेही सुचविले.

**निर्णय : त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव अंशतः मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला : -**

**ठराव क्र. १२६१:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उप-कलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत -

१) कटाई नाका बदलापूर कि.मी. ०/००० ते १९/२०० कामासाठी मे. अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांची भाववाढीसहीत सुधारीत निविदा रु.१०८.१७ कोटी किंमतीस अधिक प्रत्यक्ष कामानुसार अनुज्ञेय भाववाढ (Escalation) अदा करण्यास मान्यता देत आहे. तसेच या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

२) कटाई नाका बदलापूर कि.मी.०/००० ते १९/२०० कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.शिरीष पटेल असोसिएट्स कंन्सल्टंट प्रा. लि. यांची सुधारीत फी (१०८.१७ x २.२ %) रु.२.३८ कोटी होणार असून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या वाढीव शुल्कास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.११ : प्राधिकरणाची आयकरबाबतची सद्यःस्थिती व आयकर विभागाने प्राधिकरणाच्या विरोधात विविधी स्तरावर दिलेल्या निर्णया विरोधात प्राधिकरणाची बाजू ITAT व मुंबई उच्च न्यायालयात मांडण्याकरीता विख्यात कर विधीज्ञ श्री. सोली दस्तूर यांची नेमणूक करण्याबाबत.**

११.१ या विषयावर माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, आयकर विभागाने प्राधिकरणाच्या विरोधात दिलेले विविध निर्णय तसेच आयकर विभागाने मागणी केलेली आयकराची

रक्कम विचारात घेता विविध अपिल / याचिकेकरीता प्रख्यात कर विधीज्ञ यांची नेमणूक करणे आवश्यक वाटते व प्राधिकरणाची बाजू प्रभावीपणे मांडण्याकरीता त्यांनी मागणी केल्यानुसार फी अदा करणे आवश्यक आहे. तसेच यापुढे सुध्दा आयकर विभागाने प्राधिकरणाच्या विरोधात आयकर न्यायधिकरण (ITAT) / मा.उच्च न्यायालय यांच्याकडे सादर होणा-या अपिलांच्या सुनावणीकरीता प्राधिकरणाची बाजू मांडण्याकरीता श्री. सोली दस्तूर यांची नेमणूक करणे आवश्यक आहे. त्यानंतर, महानगर आयुक्त असेही नमूद केले की, श्री. दस्तूर यांची नेमणूक ही Single Source म्हणून झाली असल्यामुळे आणि त्यांची प्रत्येक प्रकरणी एकंदरीत फी रु.१० लाख पेक्षा जास्त होणार आहे. त्यामुळे कार्यकारी समितीची याकरीता मान्यता आवश्यक आहे.

**निर्णय : चर्चेनंतर, कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केलाः -**

**ठराव क्र. १२६२ः**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विरोधात आयकर विभागाने मा. मुंबई उच्च न्यायालयात तसेच ITAT कडे दाखल केलेल्या व भविष्यात दाखल होणा-या आयकर संबंधी विविध याचिकेच्या सुनावणीकरीता व प्राधिकरणातर्फे बाजू मांडण्याकरीता विख्यात कर विधीज्ञ श्री. सोली दस्तूर यांची नेमणूक करण्यास तसेच कर विधीज्ञ यांनी मागणी केल्याप्रमाणे फी अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना याव्दारे प्रदान करण्यात येत आहे."

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

----------xox----------